नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 09/02/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :– दिनांक 04/05/2013 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. 84/2013 कलम 376(2)(1), 506 भादंवी सहकलम 4,8,10 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

मार्च 2012 ते मार्च 2013 दरम्यान वय 17 वर्षीय पीडिता ही आरोपी नामे– महिन्द्र दौलतराव आंबिलढुके, वय 49 वर्ष, रा. मौदा, जि. नागपूर याच्या कडे शिकवनी(टयुशन) करीता जात असता आरोपीने 10 व्या वर्गात नापास करण्याची धमकी देवून तसेच लग्नाचे आमीष दाखवुन तिच्या सोबत वेगवेगळया ठिकाणी जबरी संभोग करून शारीरिक व मानसिक त्रास देवून जिवाने मारण्याची धमकी दिली. आरोपीला दिनांक 04/05/2013 चे 18.30 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.एम. के. तायडे, पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक 08/02/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. पी. एफ. सैय्यद, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 376 (2)(एफ) भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 10 वर्ष सश्रम कारावास व 30,000/–रू. दंड, कलम 506 भादवी मध्ये 2 वर्ष शिक्षा व 5,000/–रू. दंड व पीडितेला 25,000/–रू. दंडाची रक्कम देवून असा एकुण 35,000/–रू. दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी/कर्मचारी म्हणुन सहा.फौज. श्री. बेनीश्याम तालेवार, शंकरराव तराळे, वासुदेव मस्के, पोहवा श्री. मनोज तिवारी, सुनिल डोंगरे यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि. मी. सावळी फाटया जवळील जाम नदीचे पुला खाली येथे दिनांक 07/02/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 08/02/2021 चे 08.00 वा. दरम्यान सुरेश बाबुलालसिंग बैस(मृतक), वय 53 वर्ष, रा. सावळी पर्बत हा त्याचे ताब्यातील एमएच– 31/ऐएक्स– 2158 कमांकाच्या मोटरसायकलनी शेताकडे गेला. रात्री 10.30 वा दरम्यान त्याची पत्नीसोबत मोबाईलवर म्हणाले की, ''काही वेळाने घरी येतो'' पण ते काही घरी आले नाही. दि 08/02/2021 रोजी सकाळी 08.00 वा. दरम्यान काटोल ते नागपूर राज्य महामार्ग क 247 वरील सावळी पर्बत फाटयाजवळील जाम नदी उताराातील पूलाखाली काटोल कडून नागपूरकडे जातांना डावे भागाकडील पूलाचे संरक्षण कठडे टूटलेल्या पिल्लर जवळून मोटर सायकलसह जामनदी पुलाचे प्रथम पिल्लर वर मोटर सायकल सह पूलाचे आतमध्ये पिल्लरवर मोटरसायसह धडकल्याने व मोटर सायकलचे हेडलाईटचा उजेड बरोबर नसल्याने त्याचे ताब्यातील मोटर सायकल भरधाव वेगाने पूलातील सिमेंट कॉंगेटनी बनलेल्या पिल्लरवर आदल्याने त्याचे डोक्याला गंभीर मार लागून त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामपाल गोकूलसिंग बैस वय 44 वर्ष, रा. सावळी पर्बत यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर